MHKO070000541997

**नियमित दिवाणी दावा क्रं.१३०/१९९७ निशाणी क्र.२४२ वरील आदेश**
**( भास्कर आत्माराम कांबळे –विरुध्द– मारुती सिध्दु कांबळे, वगैरे )**

प्रस्तुत अर्ज वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश २२ प्रमाणे वादी क्र.१ चे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादींचे कथन असे की, प्रस्तुत दाव्यातील वादी भास्कर आत्माराम कांबळे हे दि.१९/०५/२०२१ रोजी मयत झलेले आहेत. त्यांच्या मृत्युसमयी त्यांना पत्नी, एक मुलगा व एक मुलगी असे वारस होते. तथापी त्यांची मुलगी सुनंदा भारत कांबळे ही दि.२२/०९/२०२१ रोजी मयत झालेली आहे. त्यांना खालीलप्रमाणे वारस आहेत.

१. **विनोद भास्कर कांबळे (मुलगा)**
व.व.४२, धंदा–शेती,
रा.नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

२. **सुशिला भास्कर कांबळे (पत्नी)**
व.व.६२, धंदा–घरकाम,
रा.नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

३. **रोहित भारत कांबळे (मयत मुलीचा मुलगा)**
व.व.१९, धंदा–शिक्षण,
रा. नांदणी, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर.

४. **प्रणित भारत कांबळे (मयत मुलीचा मुलगा)**
व.व.१३, धंदा–शिक्षण, रा.सदर, अज्ञान सबब अ.पा.क.
व हितचिंतक आजी सुशिला भास्कर कांबळे.

वरीलप्रमाणे मयतास वारस असून मयताचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक असल्याने तसेच मयत भास्कर कांबळे हे एकमेव वादी नसून अन्य वादीही आहेत. अशा स्थितीत दावेकामी मयताचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. सबब, मयत भास्कर कांबळे यांच्या नावापुढे मयत असा शेरा मारुन वरील वारसांना 'अ', 'ब', 'क', 'ड' असे पोटनंबर देवून सरनाम्यात त्याप्रमाणे वारसांची दुरुस्ती करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती प्रस्तुत वादी यांनी केली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यास आक्षेप नोंदवला.

**०४.** प्रकरणातील वादपत्र व कागदपत्रे पाहिली तसेच उभयतांतर्फे वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा हक्कज्ञापनाकरीता व वाटणीकरीता दाखल केला आहे. प्रस्तुत वादी यांनी दाव्यातील वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे तसेच त्यांची मुलगी सुनंदा यांच्या मृत्युदाखल्यांच्या साक्षांकीत प्रती नि.२४०/१ व २४०/२ कडे दाखल केलेल्या आहेत. त्यांचे अवलोकन करता वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे हे दि.१९/०५/२०२१ रोजी आणि त्यांची मुलगी सुनंदा ही दि.२२/०९/२०२१ रोजी मयत झालेचे दिसून येते. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दि.१४/१२/२०२१ रोजी दाखल केलेला आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाच्या सूओ-मोटो रिट पिटीशन (सिव्हील) नं.३/२०२० मधील दि. २३/०९/२०२१ रोजीच्या आदेशाच्या अनुशंगाने प्रस्तुतचा अर्ज विहित मुदतीत दाखल करण्यात आल्याचे दिसून येते. वादी यांनी मयत वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे यांना प्रस्तुत अर्जात नमुद केलेल्या व्यक्तींशिवाय अन्य कोणीही वारस नसलेचे शपथेवर कथन केले आहे. दाव्याचे स्वरुप पहाता सदर वारसदारांचा दावा चालवण्याचा अधिकार टिकून रहात असलेचे स्पष्ट होत आहे. त्यामुळे अर्जामध्ये नमुद केलेल्या वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे यांच्या वारसांना प्रस्तुत दावेकामी वादी म्हणून पक्षकार करणे आवश्यक आहे.

सबब, मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. प्रस्तुत अर्जात नमुद केलेल्या वारसांना मयत वादी क्र.१ भास्कर आत्माराम कांबळे यांच्या नावापुढे मयत असा शेरा मारुन त्यांचे वारस या नात्याने वादी क्र.१(अ), १(ब), १(क) आणि १(ड) म्हणून दाव्यामध्ये समाविष्ठ होण्याची परवानगी देण्यात येते.

३. वादींनी मुळ दाव्यामध्ये योग्य ती दुरुस्ती या आदेशाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत करावी आणि सुधारीत वादपत्र दाखल करावे.

स्वाक्षरीत/-

दिनांक : १०/०१/२०२२

ठिकाण : जयसिंगपूर.

**(रोहिणी अ. जाधव)**
२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
जयसिंगपूर